# उरण वायुविद्युत केंद्राचा २७ वा वर्धापनदिन संपन्न




वर्धापनदिनानिमित्त व्यासपीठावर डावीकडून सर्वश्री.सगदेव, चंद्रकांत थोटवे, अरविंद चौधरी, दिवाकर केदार व वसंत खोकले

या वर्षी वीजनिर्मितीत दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या उरण वायुविद्युत केंद्राचा २७ वा वर्धापनदिन दिनांक २० फेब्रुवारी रोजी साधेपणाने परंतु उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दिवंगत कर्मचारी कै.घरत यांच्या दु:खद निधनामुळे यावर्षी हा सोहळा नेहमीच्या डामडौलाला फाटा देऊन साजरा करण्यात आला. वर्धापनादिनाच्या निमित्ताने दुपारच्या सत्रात सर्व कर्मचाऱ्यांसाठी अग्निशमन विभागात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



वर्धापनदिनानिमित्त खास प्रेरणादायक गीताचे सादरीकरण करताना श्री.सुरजुसे व सहकारी

वर्धापनदिनानिमित्ताने खास शुभेच्छा देण्यासाठी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (संचलन-सुव्यवस्था) श्री.चंद्रकांत थोटवे व कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री.अरविंद चौधरी प्रामुख्याने येथे उपस्थित होते. या महिनात सेवानिवृत्त होणारे उरण वायुविद्युत केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.दिवाकर केदार यांच्या अथक परिश्रमाने अत्यंत नयनमनोहर रूप लाभलेल्या येथील कर्मचारी वसाहतीची पाहणी करून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

संध्याकाळच्या सत्रातील पुरस्कार वितरण सोहळयासाठी मा.श्री.थोटवे व मा.श्री.चौधरी यांचेसह भेंडखळ ग्रामपंचायतीचे सरपंच मा.श्री.दशरथ भगत व उपसरपंच मा.सौ. संध्या ठाकूर तसेच परिसरातील अन्य प्रतिष्ठित उपस्थित होते. कार्यक्रमाआधी कै.घरत यांना सर्वांतर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. सदर कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलनाने झाल्यानंतर सर्व मान्यवर उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कर्मचारी श्री.सुरजुसे, अशोक तडवी (तबला) यांनी अत्यंत समर्पक असे स्वागतगीत सादर केले. यानंतर आपल्या प्रास्ताविकात उरण वायुविद्युत केंद्राचे अधीक्षक अभियंता श्री.वसंत खोकले यांनी केंद्राच्या वीजनिर्मितीसंबंधित गौरवास्पद कामगिरीचा परामर्श घेतला. यानंतर कर्मचाऱ्यांच्या वतीने सौ.राव यांनी आपले प्रातिनिधीक मनोगत व्यक्त केले. मा.श्री.चंद्रकांत थोटवे यांनी आपला मनोगतात उरण केंद्राच्या कामगिरीबद्दल आणि वसाहतीतील विधायक उपक्रमांबद्दल गौरवोदगार काढले. वसाहतीचे स्वरूप जर व्यवस्थित नीटनेटके असेल तर त्यातून वीजकेंद्राच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीचे प्रतिबिंब आपोआप दिसते असे मार्मिक उद्गार त्यांनी काढले. इतर वीजनिर्मिती केंद्रामधील वसाहतींनी आदर्श घ्यावा अशा प्रकारे येथील कर्मचारी वसाहत विकसित झालेली आहे. श्री.दिवाकर केदार यांची तळमळ आणि कर्मचाऱ्यांची त्यांना लाभलेली साथ यामुळेच हे शक्य झाले आहे असे ते म्हणाले.

सुधारणा ही एक अखंड प्रक्रिया असल्याने श्री.केदार यांनी ज्या उत्साहाने वसाहतीचा विकास घडवून आणला आहे त्याच उत्साहात यानंतरही वसाहतवासी कर्मचाऱ्यांनी वसाहतीची अधिकाधिक चांगली निगा राखावी असे आवाहन याप्रसंगी मा.श्री.अरविंद चौधरी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. वीजकेंद्राची पाहणी केल्यानंतर तेथील उत्तम कार्यसंस्कृतीबद्दलही त्यांनी गौरवोदगार काढले.



मुख्य महाव्यवस्थापक श्री.दिवाकर केदार आपले मनोगत व्यक्त करताना

कार्यक्रमाच्या शेवटी आपला सर्व कर्मचाऱ्यांशी मनमोकळा दीर्घ संवाद साधत मा.श्री. केदार यांनी आपले विचार मांडले. उरण केंद्र व वसाहतीशी प्रदीर्घकाळ भावनिकदृष्टया निगडीत झालो असल्याने आता या पुढेही या सुधारणा अशाच सुरू राहव्यात यासाठी सर्वांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. या विकासाचे श्रेय जरी मला दिले जात असले तरीही सर्व कर्मचाऱ्यांची साथ आणि मुख्यालयाकडून मिळालेले मार्गदर्शन यामुळेच हे सारे शक्य झाले असेही त्यांनी नमूद केले. 'अंगात धमक असेल तर चमक आपोआप येते', असे मार्मिक विधान करून त्यांनी सर्व उपस्थितांना प्रेरित केले. आपल्या आजारपणाच्या काळात आपणा सर्वांच्या शुभेच्छामुळेच मी आज इथे



उभा आहे असे ते नमूद करत असताना सभागृहातील वातावरणही भावुक झाले होते.

यानंतर रांगोळी स्पर्धेतील विजेत्या महिलांना, युवतींना पुरस्कार प्रदान करण्यात झाले. तसेच शैक्षणिक वर्गात उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या पाल्यांचा बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात आला. रांगोळी स्पर्धेत (महिलागट) शुभांगी घनवट, साधना लोखंडे तसेच मुलींच्या गटात तमन्ना पाटील, प्रियांका पवार, सुनिता खैरनार यांनी पुरस्कार प्राप्त केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे समयसूचक सूत्रसंचालन श्री.देशपांडे यांनी केले. आभारप्रदर्शन अभियंता श्री. सगदेव यांनी केले. सदर कार्यक्रमास मुख्यालयातून जनसंपर्क अधिकारी श्री.महेश आफळे, उरण परिसरातील कर्मचारी, इतर नागरिक व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उरण वायुविद्युत केंद्राची विक्रमी कामगिरी

महानिर्मितीच्या उरण वायुविद्युत केंद्राने यावर्षी अत्यंत कौतुकास्पद कामगिरी बजावून गेल्या अनेक वर्षातील आपले वीज उत्पादनाचे विक्रम मोडले आहेत.

२००८-२००९ या आर्थिक वर्षात या केंद्राने आतापर्यंत ३९०३ द.ल. युनिट्स इतकी विक्रमी निर्मिती करताना ९८.७५% इतकी संच उपलब्धता प्रस्थापित केली आहे.

विशेष म्हणजे या वर्षासाठी नियोजन आयोग, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य वीजनियामक आयोग या सर्वांनी वीजनिर्मितीचे वर्षभरासाठीचे जे उद्दिष्ट्य ठरवून दिलेले आहे ते उरण केंद्राने जवळपास सुमारे एक महिना आधीच पूर्ण केले आहे. उरण वायुकेंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे महानिर्मितीतर्फे अभिनंदन.